नियतकालीक बदल्या-२०२६
बदली/नेमणूक/पदस्थापना
कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ सहायक

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
गृहनिर्माण भवन, कलानगर बांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
आदेश क्र.प्राधि/बदली/कनि.वा.सहा./२०२६/ 9227609 /प्र.८
दिनांक:- १९.०६.२०२६.

**संदर्भ** : मा. सचिव/प्रा. यांचे आदेश क्रमांक-९१९८८७६/प्र.८. दिनांक-१६.०६.२०२६.

**सुधारीत आदेश -**

संदर्भाधिन आदेशान्वये म्हाडा प्राधिकरण व प्राधिकरण अंतर्गत इतर विभागीय मंडळामधील कार्यरत **कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ सहायक** संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या नियतकालीक सर्व साधारण बदल्या करण्यात आलेल्या होत्या.

प्रादेशिक मंडळाचे मुख्य अधिकारी तसेच प्राधिकरणातील विभागप्रमुख यांनी केलेल्या विनंतीनुसार मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने प्रशासकीय हित व कार्यालयीन कामकाजाची निकड पाहता संदर्भांकित आदेश रदद करण्यात येत आहेत.

सबब सुधारित आदेश खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत असून कर्मचारी यांच्या नावासमोरील स्तंभ-4 मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी त्यांची बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | सध्याचे कार्यालय व मंडळ | बदलीनंतरचे कार्यालय व मंडळ | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. अमित शेषरावजी शिरपुरकर | वास्तुशास्त्रज्ञ/ मुंबई मंडळ | वास्तुशास्त्रज्ञ विभाग/ नागपूर मंडळ | वास्तुशास्त्रज्ञ विभाग / नागपूर मंडळ रिक्त पदी |

२/- महाराष्ट्र विधानमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरु होत असल्याने तात्काळ प्रशासकीय निकड लक्षात घेता उपरोक्त नमूद कर्मचा-यांना **दिनांक-२२.०६.२०२६** पासून स्तंभ **३** येथील नमूद विभागातून एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे.

**३**/- सदर आदेश हेच कार्यमुक्ततेचे आदेश असून संबंधीत विभागांनी नव्याने आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता नाही.

४/- सदर आदेशातील मुंबईस्थित विभागीय मंडळामधील कर्मचारी यांनी **दिनांक-२३.०६.२०२६** व मुंबई बाहेरील इतर विभागीय मंडळामधील कर्मचारी यांनी **दिनांक-२४.०६.२०२६ (म.पू.)** पर्यंत बदलीच्या विभागात रुजू व्हावे. सदर कर्मचारी रुजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचे विरुध्द शिस्तभंग कारवाई करण्यात येईल.

५/- महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-**२००५** या अधिनियमातील तरतुदींनुसार मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा.यांचे मान्यतेनुसार सदर बदल्या करण्यात आलेल्या आहेत. यास्तव बदली झालेल्या कर्मचा-यांना कार्यमुक्त करणे बंधनकारक आहे. त्यामुळे सदर आदेशानुसार ते बदलीच्या ठिकाणी हजर न झाल्यास त्यांचा आदेशाच्या दिनांकापासून बदलीच्या ठिकाणी रुजु होईपर्यंतचा कालावधी सेवा खंड धरण्यात येईल व सदर सेवा खंडाची नोंद ज्येष्ठतासुचीमध्ये घेण्यात येईल.

६/- बदली झालेल्या कर्मचा-यांनी त्यांची बदली रदद करणे अथवा त्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दबाव आणल्यास संबंधीतांची कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, **१९७९** मधील नियम **२३** मधील तरतुर्दीनुसार गैरवर्तणूक समजण्यात येईल.

**७/- वित्त नियंत्रक/प्रा. व संबंधीत लेखाधिकारी यांना कळविण्यात येते की, उपरोक्त कर्मचा-यांचे दिनांक-०१.०७.२०२६ पासूनचे वेतन कोणत्याही परिस्थीतीत पूर्वीच्या विभागातून अदा करण्यात येऊ नये. अन्यथा त्यांना व्यक्तीश: जबाबदार धरण्यात येईल.**

८/-बदलीनंतर उक्त कर्मचा-यांना वेतनासह महागाई भत्ता व अन्य भत्ते अनुज्ञेय राहतील. तसेच त्यांना नियमानुसार बदली प्रवास भत्ता अनुज्ञेय राहील.

९/- संबंधीत विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांनी संबंधीत कर्मचारी यांना कार्यमुक्त केल्याचा व संबंधीत कर्मचारी बदलीच्या ठिकाणी रुजु झाल्याबाबतचा अनुपालन अहवाल तात्काळ सचिव/प्रा. कार्यालयास सादर करावा.

१०/- संबंधीत नियंत्रक अधिका-यांना कळविण्यात येते की, विहीत कालावधीत संबंधीत कर्मचारी रुजु न झाल्यास त्याबाबत प्राधिकरणास अवगत करावे. तसेच त्यांच्या विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम-**१९८१** मधील नियम-**३०** (सी) नुसार त्यांचा रजेचा अर्ज स्वीकारु नये, मंजूर करु नये.

सदर बदली आदेश म्हाडाच्या www.mhada.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**(मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांचे मान्यतेने)**

19/6/2026

**(प्रफुल्ल ठाकूर)**
**सचिव/प्राधिकरण**

**प्रति,**

------------------------------------------------------------

(वरील संबंधित कर्मचारी यांस त्यांचे विभाग प्रमुखामार्फत)

**प्रत सस्नेह अग्रेषित:**

१. मा.मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२. मा.मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मुं.इ.दु.व पु. मंडळ
३. मुख्य अभियंता-1,2,3/प्रा.
४. वित्त नियंत्रक/प्रा.
५. विधी सल्लागार/प्रा.
६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
७. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.
८. मुख्य अधिकारी, मुं.झो.सु.मं., कोंकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अमरावती, नागपुर मंडळ
९. चौकशी अधिकारी/प्रा.
१०. सक्षम प्राधिकारी-1,2/प्रा.
११. मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.
१२. सहमुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मुं.इ.दु.व पु. मंडळ
१३. उपमुख्य अभियंता, दु. व गु. नि. कक्ष, पी.एम.ए.वाय/प्रा., विशेष नियोजन प्राधिकरण/प्रा.
१४. उपमुख्य अभियंता, प्र.नि.स., पुर्व, पश्चिम, बीडीडी/मुंबई मंडळ/मुं. झो. सु. मंडळ
१५. उपमुख्य अभियंता, परिमंडळ-1,2,3,4/मुं.इ.दु.व.पु.मंडळ